॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**वित्त- खरेदी विभाग** Tel.No. (0257) 2257236, 237 e-mail :- po@nmu.ac.in

जा.क्र. कबचौउमवि/पी-02/526/2026 दि : 14/08/2026 17

प्रति,
श्रीमती कोमल जयपुरा,
साई ग्राफिक्स,291-B,फुटी कोठी, प्रजापतनगर,
इंदौर, (म.प्र.) पिन- 452009
भ्रमणध्वनी,9039487529 / 9617419730
saigraphics9039@gmail.com

**विषय :- छपाईच्या वार्षिक दर कराराचा कार्यादेश स्विकारून कामकाज स्विकृत न केल्यामुळे पुरवठादारांच्या काळ्या यादीत नाव समाविष्ट केल्याबाबत.**

संदर्भ :-
1) विद्यापीठ ई-निविदा जा.क्र.कबचौउमवि/8/वित्त/एकत्रित निविदा सुचना/46/2026,दि.06/01/2026
2) टेंडर आय.डी.2026_NMUJ_1292075_1.
3) मा.खरेदी सभा ठराव ख.स.क्र.14/2026, दि.18.05.2026
4) आपले ई-मेलव्दारे सादर केलेले दि.18.05.2026 रोजीचे पत्र
5) विद्यापीठ कार्यादेश जा.क्र.कबचौउमवि/पी-02/वित्त/8/360/2026, दि.11.06.2026
6) आपणाकडील दि.13.06.2026 रोजीचा ई-मेल.
7) आपणाकडील दि.14.06.2026 रोजीचा ई-मेल.
8) विद्यापीठ पत्र जा.क्र.कबचौउमवि/8/376/2026,दि.22.06.2026
9) आपणाकडील दि.22.06.2026 रोजीचा खुलासा सादर करणारा ई-मेल.
10) मा.खरेदी समितीद्वारा पारीत ठराव ख.स.क्र. 21/2026,दि.17.07.2026

महोदया,

विद्यापीठाव्दारा संदर्भ क्र.1 व 2 अन्वये प्रसिध्द केलेल्या ई-निविदेनुसार,विद्यापीठाच्या विविध प्रकारच्या छपाई कामासाठी सन 2026-2027 साठीचा वार्षिक दर करार (Annual Rate Contract) करण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

सदरच्या ई-निविदेत आपल्या फर्मव्दारा सहभाग नोंदविल्यानुसार,छपाईच्या विविध साहित्य प्रकारांसाठी दरांच्या भागात (Price-Bid) सादर केलेल्या किमान दरांनुसार (L-1)संदर्भ क्र.3 व 4 अन्वये मा.खरेदी समितीने पारीत केलेल्या ठरावानुसार आपणास छपाईचे कामकाज देण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला होता. त्यानुसार संदर्भ क्र.5 अन्वये आपल्या फर्मसोबत छपाईचा वार्षिक दर करार केल्याबाबतचा कार्यादेश निर्गमित करण्यात आलेला असुन संदर्भ क्र.6 नुसार वार्षिक दर करारातील अटी व शर्तीनुसार करार करण्याबाबत लेखी सहमती कळविली आहे.

तदनंतर आपणाकडून संदर्भ क्र.7 अन्वये कळविल्यानुसार,निविदेच्या दरांच्या भागात (Price-Bid) नमुद करताना झालेल्या मानवीय त्रृटीतुन चुकीच्या दर्शविल्या गेल्या असुन व्यावहारिकदृष्ट्या छपाईचा वार्षिक दर करार (Printing ARC) करण्यात असमर्थतता दर्शवुन निविदेसोबत भरणा केलेली रु.70,000/-ची बयाणा रक्कम (EMD) परत मिळण्याबाबत विनंती केली आहे.

उपरोक्त अनुषंगाने,विद्यापीठाने संदर्भ क्र.8 अन्वये कळविल्यानुसार,छपाईचा कार्यादेश स्विकारून छपाईचा वार्षिक दर करार करण्यास असमर्थतता दर्शविल्याने कार्यादेशातील अटी व शर्तीनुसार सदरची कृती ही दंडनीय कारवाईस पात्र आहे. त्यामुळे आपण भरणा केलेली बयाणा रक्कम रु.70,000/- विद्यापीठाकडे कायमस्वरुपी जप्त करण्यात येऊन आपल्या फर्मचे नाव पुरवठादारांच्या काळ्या यादीत समाविष्ट का करण्यात येऊ नये ? याबाबतचा खुलासा सादर करण्याबाबत कळविले होते.

(..2..)

त्यानुसार आपणाकडून संदर्भ क्र.9 वरील प्राप्त ई-मेलद्वारे सादर केलेल्या खुलासा विद्यापीठाच्या मा.खरेदी समितीच्या दि.17.07.2026 रोजी संपन्न झालेल्या सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्यावर मा. खरेदी समितीने घेतलेल्या निर्णयानुसार, छपाईच्या कामकाजासाठी विद्यापीठाद्वारा प्रसिध्द ई-निविदेतील अटी व शर्तींचे आपणाकडून पालन करणे अत्यंत आवश्यक होते. तथापि,आपण दि.22.06.2026 रोजी सादर केलेल्या खुलाश्यात नमुद केलेल्या बाबी ह्या समर्थनीय नसल्यामुळे सदरचा खुलासा अमान्य करण्यात आलेला आहे.

तसेच आपणाकडून विद्यापीठ कार्यालयाशी केलेल्या वर्तनाचा विचार करता, दंडनीय स्वरुपात कारवाईचा भाग म्हणून ई-निविदे सोबत भरणा केलेली बयाणा रक्कम रू.70,000/-ही कायमस्वरुपी जप्तीची कारवाई करण्यात येत असून 03 वर्षांच्या कालावधीसाठी आपल्या फर्मचे नाव विद्यापीठाद्वारा घोषित केलेल्या पुरवठादाराचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

त्या अनुषंगाने आपणास असेही कळविण्यात येते की, आपण निविदेसोबत भरणा केलेली बयाणा रक्कम (EMD) रु.70,000 कायमस्वरूपी जप्त करण्यात आलेली असल्यामुळे, सदर रक्कम परत मिळण्याबाबत अथवा पुरवठादाराच्या काळ्या यादीतून नाव वगळण्याबाबत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येऊ नये, अशा स्वरुपाचा पत्रव्यवहार केल्यास त्याबाबतची कुठलीही दखल विद्यापीठाच्या स्तरावरुन घेण्यात येणार नाही, याची गांभीर्याने नोंद घ्यावी,ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

**( सीए रविंद्र एन.पाटील )**
**सचिव, मा. खरेदी समिती तथा**
**वित्त व लेखा अधिकारी**
**कबचौउमवि, जळगांव**

प्रत माहितीस्तव सादर.

1) मा. कुलगुरु कार्यालय / मा. प्र-कुलगुरु कार्यालय / मा. कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि,जळगाव
2) सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे मा. संचालक, विभागप्रमुख, कबचौउमवि,जळगाव

आपणास याव्दारे कळविण्यात येते की,उपरोक्त अनुषंगाने साई ग्राफिक्स, इंदौर या पुरवठादारास सदरचे पत्र निर्गमित केल्यापासुन 03 वर्षाच्या कालावधीसाठी काळ्या यादीत समाविष्ट केलेले असून सदरच्या कालावधीत विद्यापीठाकडून त्यांना छपाईशी निगडीत कोणतेही कामकाज दिले जाणार नाही, अथवा त्यांनी कार्यालयास सादर केलेले दरपत्रके, निविदा, ई-निविदेत सहभाग नोंदविता येणार नाही किंवा नोंदविलेला सहभाग विचारात घेऊ नये, याची कटाक्षाने दखल घ्यावी,ही विनंती.

3) मा. संचालक, स्कुल ऑफ कॉम्प्युटर सायन्सेस प्रशाळा,कबचौउमवि,जळगाव.

साई ग्राफिक्स, इंदौर या पुरवठादाराचे नाव सदरचे पत्र निर्गमित केल्यापासून 03 वर्षांच्या कालावधीसाठी काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येत आहे. त्यासाठी सदरचे पत्र हे विद्यापीठ संकेतस्थळावरील http://nmu.ac.in/en-us/useful-links/Tenders या Link मधील List Of Black listed Supplier यामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्यात यावी,ही विनंती.

**( सीए रविंद्र एन.पाटील )**
**सचिव, मा. खरेदी समिती तथा**
**वित्त व लेखा अधिकारी**
**कबचौउमवि, जळगांव**